# नगर परिषद,मलकापूर जि.बुलढाणा

## अंदाज पत्रकीय विशेष सभा ठराव क्र1 दिनांक 24/2/2021

मा.अध्यक्ष महोदय यांचे नोटीस क्रं.नपम/अंदाजपत्रकीयसभा/अध्यक्ष/6542/2021दि.17/02/2021 नुसार न.प.ची.अंदाज पत्रकीय विशेष सभा दि.24/2/2021 ला सभा व्हीडिओ कॉन्फसींगद्वारा बोलाविण्यात आली.सदर सभेकरीता आवश्यक असणारी गणपूर्ती पुर्ण झाल्याने अध्यक्ष यांचे आदेशानुसार सभेचे कामकाज सुरु करण्यात आले.सन 2020-21 चे सुधारित अंदाजपत्रक व सन 2021-22 चे नविन अंदाजपत्रक स्थायी समिती सभा ठराव क्रं.1 दि.2/2/2021 नुसार मंजूर करुन न.प.सर्व साधारण सभेस मंजूर करण्यास शिफारस केली होती. न.प.चे सुधारीत 2020-21 चे व नविन अंदाजपत्रक सन 2021-22 व तुट भरुन काढण्याचा कृति आराखडा लेखापाल यांनी सादर अंदाज पत्रकावर सविस्तर चर्चा करण्यात आली. चर्चेत श्री.रशिदखॉ युसूफखॉ जमादार,राजेंद्र वसंतराव वाडेकर,अनिल शिवरतन गांधी विजयराव जगन्नाथराव जाधव यांनी सहभाग घेतला. सादर केलेल्या अंदाजपत्रकाचे अवलोकन केले असता तुट भरुन काढण्यासाठी सादर केलेल्या कृति आराखडयातील अनु क्रं.1मालमत्ता वर शास्ती आकारणी करणे अनु क्रं.2 पाणी पट्टीत वाढ करणे ,अनु क्रं.4 थकीत पाणी वसुली वर 2 टक्के शास्ती लावण्यास हरकत घेण्यात आली याबाबतचे निवेदन श्री.राजेंद्र वसंतराव वाडेकर,रशिदखॉ युसूफखॉ जमादार,अनिल शिवरतन गांधी,राजेश विश्वनाथ पाटील,मो.जाकीर मो.ईलियास,मो.जावेद मो.सलीम कुरेशी यांचे स्वाक्षरीचे निवदेन मा.अध्यक्ष महोदय यांना सादर केले यावर सविस्तर चर्चा करण्यात आली .सन 2020-21 चे सुधारित अंदाजपत्रक व सन 2021-22 चे नविन अंदाजपत्रक खालील प्रमाणे

### सन 2020-21 चे सुधारित अंदाजपत्रक

| | | |
|---|---|---|
| सुरवातीची शिल्लक | - | 7494969 |
| एकुण उत्पन्न | - | 393174700 |
| एकुण जमा | - | 400669669 |
| एकुण खर्च | - | 398159255 |
| अखेरची शिल्लक | - | 2510414 |

### सन 2021-22 चे नविन अंदाजपत्रक

| | | |
|---|---|---|
| सुरवातीची शिल्लक | - | 2510414 |
| एकुण उत्पन्न | - | 641630000 |
| एकुण जमा | - | 644140414 |
| एकुण खर्च | - | 641615000 |
| अखेरची शिल्लक | - | 2525414 |

तसेच मुख्याधिकारी यांनी सन 2019-2020 ची विभाग निहाय वार्षीक तुट होती.

| | | |
|---|---|---|
| 1. पाणी पुरवठा व जल निस्सारण सेवा | - | 11401887 |
| 2. गटारे साफ करणे,घनकचरा वाहतूक व विल्हेवाट | - | 1518592 |
| 3. रस्त्यावरील दिवाबत्ती | - | 2879602 |
| 4. एम.जी.पी.व नवि 6 अ चे कर्ज | - | 29501072 |
| 5. एकात्मिक विकास योजना | - | 988000 |

वरील तूट भरुन काढण्यासाठी मुख्याधिकारी यांनी सादर केलेल्या कृती आराखडयातील अनु.क्रं. 1,2,4 शास्तीस व पाणी पट्टीस वाढीस सर्व सदस्यांचा विरोध असल्याने शास्ती रद्द करण्याबाबत चा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यास तसेच शहरातील मोठया प्रमाणात अवैध नळ कनेक्शन शोध मोहीम राबवुन त्या द्वारे मोठया प्रमाणात उत्पन्नात वाढ होईल तसेच दुकान भाडे वाढ करुन निर्माण होणारी तुट भरुन काढता येईल असे राजेंद्र वसंतराव वाडेकर यांनी सभेसमोर मुद्दा मांडला त्यास सर्व सदस्यांनी मान्यता दिली. त्यानुसार तुट भरुन काढण्याकरिता उपाय योजनामध्ये समावेश करण्यास उर्वरित अनु क्रं.3,5,6,7 नुसार तुट भरुन काढण्यास व सन 2020-21 चे सुधारीत अंदाजपत्रकास व सन 2021-22 चे नविन अंदाजपत्रकास सर्वानुमते सभेने मान्यता देत आहे.

सुचक :- श्री.राजेंद्र वसंतराव वाडेकर

अनुमोदक :-श्री.अनिल शिवरतन गांधी

ठराव सर्वानुमते मंजुर

HRRawalpn

( हरीश महादेवसिंह रावळ)

अध्यक्ष,

नगर परिषद,मलकापूर

## नगर परिषद कार्यालय मलकापूर जि.बुलढाणा

नगर परिषदेची अंदाजपत्रकीय सभा दिनांक 24/02/2021 रोज बुधवार ला व्हिडीओ कॉन्फरसींगद्वारे आयोजित के होती सदर सभेस खालील प्रमाणे सदस्य ऑनलाईन उपस्थित होते.

| अ.क्र. | नवनिर्वाचित सदस्यांचे नांव | पद |
|---|---|---|
| 1 | रावळ हरीश महादेवसिंह | अध्यक्ष |
| 2 | जमादार रशिद खा युसुफ खा | उपाध्यक्ष |
| 3 | जमादार समिना परविन रईस खा | सदस्य |
| 4 | अवसरमोल रेखा प्रमोद | सदस्य |
| 5 | खडेकर राजेंद्र वसंतराव | सदस्य |
| 6 | जाधव विजयराव जगन्नाथराव | सदस्य |
| 7 | झांबी अनिल शिवरतन | सदस्य |
| 8 | जैस्वाल अनिल मोतीलाल | सदस्य |
| 9 | सौ.पुजा गोपाल राठी | सदस्य |
| 10 | कुरेशी मो.जावेद मो.सलीम | सदस्य |
| 11 | शाह एजाजअहेमद अयाज | सदस्य |
| 12 | खान शहजाद सलिम | सदस्य |
| 13 | रजाउल्लाखाँ रफीउल्लाखाँ | सदस्य |
| 14 | शेख महेरुनीसा रफीक | सदस्य |
| 15 | देशमुख रोहन दिलीप | सदस्य |
| 16 | पाटील राजेश विश्वनाथ | सदस्य |
| 17 | मो.जाकीर मो.ईलीयास | सदस्य |
| 18 | सर्वे अनिल वसंत | स्विकृत सदस्य |

अध्यक्ष
नगर परिषद, मलकापूर.